**नि. फौ. खटला क्र.९०/२०२४**

**निशाणी क्र.११३**

**:: अभियोग पक्षातर्फे सा.क्र.०७ चा पुरावा ::**

**शपथेवर सत्य निवेदन करते की,**

**माझे नांव** : सुरेखा उमाकांत चौधरी,

**वय** : ४३ वर्षे, **धंदा** : आशा कार्यकर्ती,

**राहणार** : होणाळी, ता. देवणी, जि. लातूर.

**:: अभियोग पक्षातर्फे सरतपासणी साहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री एस.एम. हाशमी यांचेमार्फत ::**

०१. मी आरोपींना ओळखते. आरोपी श्रीकांत हे न्यायालयामध्ये हजर आहेत. आरोपी सुधीर हा आभासी पध्दतीने हजर आहे. (आरोपी सुधीर हा कारागृहामध्ये असल्याने आभासी पद्धतीने हजर आहे.) घटना ही वर्ष २०२१ मध्ये होणाळी येथे घडली होती. माझा मुलगा गणेश उमाकांत चौधरीचे बारावीचे शिक्षण झाले होते. त्यावेळी आरोपी सुधीरने तुमच्या मुलाचे विज्ञान शाखेमध्ये शिक्षण झालेले असल्याने व आरोग्य विभागामध्ये कोरोना प्रादुर्भावामुळे जागा असल्याने राजरतन सुर्यवंशी साहेब यांच्यासोबत बोलतो, त्याचे कागदपत्र पाठवा असे सांगितले होते. त्यानंतर दोन दिवसांनी माझ्या मुलाची निवड झाल्याचे आणि त्याची ऑर्डर काढण्यासाठी पंधरा लाख रुपये खर्च येईल आरोपी सुधीरने सांगितले. आम्ही त्यावेळी पंधरा लाख रुपये देऊ शकत नाही, बारा लाख रुपये देऊ शकतो असे सांगितले. आरोपी सुधीरने आम्हाला आरोपी श्रीकांत शिंदेचे अकाउंट नंबर दिले. मी माझे बुलढाणा बँक शाखा देवणी मधील खात्यामधून आरोपी श्रीकांतच्या बँक ऑफ महाराष्ट्र मधील खाते क्र.९४२७ यामध्ये पहिला हप्ता रु.६,००,१००/– जमा केले. आरोपी सुधीरने आम्हाला ऑगस्ट–२०२१ मध्ये सदर ऑर्डरकरिता दुसरा हप्ता आरोपी श्रीकांतच्या अकाउंट क्र.३०३८० वरती भरण्याबाबत सांगितले. त्याप्रमाणे मी माझे बुलढाणा बँक शाखा देवणी मधील खात्यामधून सदर खात्यावर रु.५,००,१००/– आणि रु.१,००,०२५/– भरले. त्याप्रमाणे मी रु.१२,००,२२५/– रुपये भरले होते.

०२. आरोपी सुधीरने दि.१३/०९/२०२१ रोजी आम्हाला आरोग्य सेवक या

पदाची ऑर्डर दिली होती. त्यानंतर आरोपी सुधीरने माझ्या मुलाला रुजू करून घेण्यासाठी लातूर येथे बोलावले होते. त्याप्रमाणे गणेश तेथे गेला होता. आरोपी सुधीरने गणेशच्या सह्या मस्टर वरती घेतल्या आणि मूळ कागदपत्रे राजरतन सुर्यवंशी यांच्या हातात दिले होते. त्यानंतर आम्ही काही दिवस थांबलो आणि रुजू करून घेतील याची प्रतीक्षा केली परंतु गणेशला रुजू करून घेतले नव्हते. आम्ही बरेचदा सुधीरला त्याबाबत विचारले असता त्याने त्याकरिता टाळाटाळ केली. आरोपी सुधीरने आम्हाला कागदपत्रांच्या झेरॉक्स दिल्या होत्या. त्यामध्ये नियुक्ती आदेश, प्रशिक्षण आदेश, पेमेंट स्लिप, मस्टरवर सह्या घेतल्याची प्रत व व्हाउचर दिले होते. सदर प्रती मी पोलिसांना तपासादरम्यान दिल्या होत्या. आता मला नियुक्ती आदेश आणि प्रशिक्षण आदेश यांच्या प्रती दाखविल्या. ह्या त्याच आहेत. (अर्ज निशाणी ११२ वरील आदेशाप्रमाणे सदर कागदपत्रांचा दुय्यम पुरावा नोंदविण्याची परवानगी दिलेली आहे.) सदर नियुक्ती आदेशास **निशाणी ११४ आणि प्रशिक्षण आदेशास निशाणी ११५** देण्यात येते.

०३. त्यानंतर आम्ही जिल्हा परिषदच्या आरोग्य विभागामध्ये चौकशी केली असता त्यांनी आरोग्य सेवकाचा आदेश दिलेला नसल्याचे समजले. त्यावेळी सर्व कागदपत्रे बनावट असल्याबाबत आमच्या लक्षात आले. त्यानंतर आम्ही आरोपी सुधीरला दिलेल्या रकमेची मागणी केली. परंतु त्यांनी त्याकरिता टाळाटाळ केली. त्यानंतर मी पोलीस ठाणे देवणी येथे सदर घटनेबाबत खबर दिली. आता मला खबर दाखविली. ही तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यामधील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी ११६** देण्यात येते. आता मला पहिली खबर दाखविला. हा तेच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यामधील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी ११७** देण्यात येते.

सरतपास पूर्ण.

**<u>:: आरोपी क्र.२ करिता उलटतपास अधिवक्ता श्री. सी.एस. मेटे यांचेमार्फत ::</u>**

०४. माझे शिक्षण १२ वी पर्यंत झाले आहे. मी वर्ष २००९ पासून आशा

कार्यकर्ती म्हणून काम करते. माझा मुलगा गणेशची १२ वी वर्ष २०१९ मध्ये झाली. वर्ष २०२१ मध्ये आरोग्य सेवकाची जाहिरात निघालेली नव्हती. गणेशने वर्ष २०२१ मध्ये आरोग्य सेवकाकरिता अर्ज केला नव्हता. शासकीय कार्यालयामधून गणेशला नोकरीकरिता कॉल आला नव्हता. गणेशने शासकीय कार्यालयामध्ये रुजू होण्यासाठी अर्ज केला होता. आरोग्य सेवकासाठी शिक्षणाची अट १० वी व १२ वी उत्तीर्ण असणे आवश्यक होते. मी दि.१९/०६/२०२४ पूर्वी फसवणुकीबाबत कुठेही तक्रार केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी खबर देताना कोणतीही कागदपत्रे जोडली नव्हती. श्रीकांत शिंदेच्या खात्यावर पैसे टाकताना त्याची संमती घेतली नव्हती. गणेशने फसवणूक झाल्याबाबत कोठेही तक्रार केलेली नाही. मी आणि आरोपी सुधीर एकाच गावातील रहिवासी आहोत. हे म्हणणे खरे आहे की, केस करण्यापूर्वी माझे आणि सुधीरचे चांगले संबंध होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे आणि आरोपी सुधीरचे अडीअडचणीमध्ये देण्याघेण्याचे व्यवहार होते. मी दिलेल्या कागदपत्रांवर माझ्या सह्या आहेत. आरोपी सुधीर आणि माझ्यामध्ये नोकरी लावून देतो एवढे पैसे द्या याबाबत लेखी नाही.

०५. खबर देताना माझ्यासोबत तोहीद शेखचे वडील, धम्मपालचे वडील आणि कांबळे हे हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही संगनमताने व विचारमिनीमय करून खबर दिली. आरोपी सुधीरने माझ्या मुलाला रुजू करून घेण्यासाठी लातूर येथे बोलावले होते, त्याप्रमाणे गणेश तेथे गेला होता, आरोपी सुधीरने गणेशच्या सह्या मस्टर वरती घेतल्या आणि मूळ कागदपत्रे राजरतन सुर्यवंशी यांच्या हातात दिले होते, आरोपी सुधीरने आम्हाला कागदपत्रांच्या झेरॉक्स दिल्या होत्या, त्यामध्ये नियुक्ती आदेश, प्रशिक्षण आदेश, पेमेंट स्लिप, मस्टरवर सह्या घेतल्याची प्रत व व्हाउचर दिले होते, आम्ही जिल्हा परिषदच्या आरोग्य विभागामध्ये चौकशी केली असता त्यांनी आरोग्य सेवकाचा आदेश दिलेला नसल्याचे समजले, हा मजकूर मी खबर देताना पोलिसांना सांगितला होता. पोलिसांनी सदर मजकूर खबर मध्ये का लिहिला नाही याचे मी कारण सांगू शकत नाही.

०६. हे म्हणणे खरे नाही की, माझे आरोपी सुधीरसोबत मतभेद झाले होते व त्यामुळे मी खोटी केस केली. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासामध्ये संपूर्ण मजकूर खोटा कथन केला आणि खोटी साक्ष दिली.

उलटतपास पूर्ण.

**:: आरोपी क्र.१ करिता उलटतपास अधिवक्ता श्री एम.एस. नागराळे यांचेमार्फत ::**

०७. माझी सुधीरच्या कुटुंबीयांची ओळख आहे. तसेच सुधीरला माझ्या कुटुंबीयांची ओळख आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही एकमेकांच्या सुख–दुःखात सहभागी होतो. माझ्या घरातील सदस्य काय करतात हे आरोपी सुधीरला माहीत होते.

प्रश्न – तुम्ही मध्यमवर्गीय असल्याने तुमची आर्थिक स्थिती साधारण आहे ?

उत्तर – माझे वार्षिक उत्पन्न ₹६,००,०००/– आहे. माझ्यामध्ये शेती असून मी आशा कार्यकर्ती आहे.

०८. हे म्हणणे खरे नाही की, पैसे द्या नोकरी लावतो असे आरोपी सुधीरने म्हटले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, सुधीरने ₹१५,००,०००/– द्या आणि आम्ही ₹१२,००,०००/– देतो असे म्हटलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी सुधीरने श्रीकांत शिंदेचा अकाउंट नंबर दिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी सुधीरने आरोग्य सेवकाची ऑर्डर दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी सुधीरने गणेशला लातूर येथे बोलावल्याचे आणि गणेश लातूरला गेल्याचे खोटे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी सुधीरने मस्टरवर गणेशच्या सह्या घेतल्या आणि मूळ कागदपत्रे राजरतन सुर्यवंशीकडे दिले हे मी बघितलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, गणेशला रुजू करून का घेत नाही याबाबत मी आरोपीला विचारणा केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला कागदपत्रांच्या झेरॉक्स दिलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला केव्हाही पैशाची मागणी केलेली नाही व त्याने पैसे देण्यास टाळाटाळ केलेली नाही. हे

म्हणणे खरे नाही की, मी राजकीय द्वेषातून आरोपीविरुध्द खोटी तक्रार केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझी फसवणूक केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी स्वतः कागदपत्रे बनवून पोलिसांना दिली.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2025.09.08 17:39:33 +0530

( श.अ. सुरजुसे )

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **दे व णी**.

दि. ०८/०९/२०२५.

सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2025.09.08 17:39:28 +0530

( श.अ. सुरजुसे )

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **दे व णी**.